संशोधन आराखडा

‘महाराष्ट्राच्या विकासातील विजयसिंह मोहिते-पाटील यांचे योगदान-एक ऐतिहासिक अभ्यास’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील ‘इतिहास’ विषयातील पीएच.डी. पदवी मिळविण्यासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

• संशोधक •

प्रा. तानाजी हनुमंत जाधव
एम.ए.(सेट), इतिहास.
इतिहास विभाग प्रमुख
महात्मा फुले नूतन महाविद्यालय, मिरजगाव,
ता. कर्जत, जि. अहमदनगर.
इमेल- thjadhav444@gmail.com
मोबाईल क्र. ९९२१११६५४८

• संशोधन मार्गदर्शक •

प्रा. डॉ. मोरे बब्रुवान केरबाजी
इतिहास विभाग प्रमुख आणि संशोधन मार्गदर्शक
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपुर, जि. लातूर.
इमेल- babruwanmore@gmail.com
मोबाईल क्र. ९९२३३५१६७८

एप्रिल २०१९

‘महाराष्ट्राच्या विकासातील विजयसिंह मोहिते-पाटील यांचे योगदान – एक ऐतिहासिक अभ्यास’

- **प्रस्तावना**

काळाचा व्यक्तिमत्वावर किंवा व्यक्तिचा काळावर व्यामिश्र प्रभाव असतो, हा प्रभाव समाजाला वेगवेळया क्षेत्रामध्ये नव्या जाणीवा निर्माण करण्याची भूमिका पार पाडत असतो. काळाचा सामाजिक दृष्टीने प्रभाव व्यापक व स्पष्ट जाणवणारा असतो. अशा प्रभावाचा अभ्यास विविध विद्याशाखेंच्यामध्ये होतो आहे, परंतू व्यक्तिच्या सामाजिक प्रभावाचा अभ्यास अपवादानेच होताना दिसतो आहे. असा अभ्यास झाल्यास सामाजिक उन्नतीचा व्यापक आढावा कारणमीमांसेच्या भूमिकेतून मांडण्यास मदत होईल. परिवर्तनाची, विकासाची नवीमूल्ये अशा अभ्यासावर निर्माण करता येतील याच भूमिकेतून ‘महाराष्ट्राच्या विकासातील विजयसिंह मोहिते-पाटील यांचे योगदान - एक ऐतिहासिक अभ्यास’ करण्याचे योजिले आहे.

सन १९६० मध्ये भाषावार प्रांतरचनेच्या धोरणानूसार महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्राच्या विकासामध्ये विविध क्षेत्रातील व्यक्तिमत्वांनी आपापल्या परीने योगदान दिले. यामध्ये प्रामुख्याने एस.एम. जोशी, ना. ग. गोरे, मधू लिमये, अण्णाभाऊ साठे, अमर शेख, मधू दंडवते, यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब खेर, बाळासाहेब विखे-पाटील, शरद पवार आणि शंकरराव मोहिते-पाटील इत्यादी मंडळीचे कार्य मोलाचे आहे.

विजयसिंह मोहिते-पाटील यांना महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, सहकार, शैक्षणिक क्षेत्रातील समृध्द वारसा आपल्या वडीलांच्याकडून मिळालेला असल्यामुळे, तो अधिक संपन्न व परिपूर्ण आहे. यादृष्टीने सदर संशोधनाचा अभ्यास केला जाणार आहे. समाजाच्या विविध घटकांच्या केंद्रस्थानी राजकीय संस्था असतात, अशा राजकीय संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, राजकीय,

सांस्कृतिक, आर्थिक विकास साधता येतो याचा प्रत्यय विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या एकूण कार्यावरून येतो.

विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरूवात अकलुजच्या सरपंच पदापासून झाली. त्यानंतर सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून १९७१ ते १९७९ या काळात उल्लेखणीय कार्य केले. १९८० पासून २००९ पर्यंत सलग एकोणतीस वर्षे माळशिरस तालुक्याचे आमदार म्हणून ते निवडून आले. याकाळात विविध खात्याचे मंत्री म्हणून काम करत असताना, आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर उपमुख्यमंत्री पद भूषविले. याकाळात त्यांनी केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. २०१४ मध्ये सोळाव्या लोकसभेचे सदस्य म्हणून 'माढा लोकसभा मतदार संघा'तून ते निवडून आले.

राजकीय पदाबरोबरच अनेक शैक्षणिक व सहकारी संस्थांमध्ये अध्यक्ष व संचालकपदी विजयसिंह मोहिते-पाटील यांनी कार्य केले, त्यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाचे अध्यक्ष, राज्य सहकारी बँकेचे संचालक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक इत्यादी पदावर काम करत असताना, सहकाराचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. साखर उद्योगाच्या माध्यमातून परिसराचा विकास करण्यामध्ये, त्यांची भूमिका महत्वपुर्ण असल्याचे दिसून येते. शिक्षणक्षेत्रामध्ये काम करत असताना, त्यांनी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षपद भूषविले. याकाळात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य केले. समाजाची व तरूणांची गरज ओळखून व्यावसायिक शिक्षणाला प्राधान्य देऊन, अनेक कोर्सेस सुरू केले. यातून त्यांचे शैक्षणिक कार्य स्पष्ट होते.

विजयसिंह मोहिते-पाटील यांनी राजकीय व सामाजिक जीवनामध्ये काम करत असताना, शेतकरी वर्ग केंद्रस्थानी मानुन जलसिंचनाची सुविधा विद्युतीकरण, कक्कूटपालन, संकरीत गायींचे वाटप, कृषी व औद्योगीक प्रदर्शने इत्यादी स्वरूपाची कामे केलेली दिसून येतात. याबरोबरच नैसर्गिक आपत्तीप्रसंगी मदतीचा हात देण्याचे बहूमोल कार्य केल्याचे दिसून येते. एकूणच विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या कार्याचा विचार करता, त्यांच्या कार्याचा ऐतिहासिक संशोधनातून अभ्यास होणे महत्वाचे

असल्याचे स्पष्ट होते. याच भूमिकेतून संशोधकाने हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

- **विषय निवड**

काळाच्या पुढे असणारे लोक आपल्या कर्तृत्वाने, समाजाला गतिमान बनवित असतात. समाजाचे साचलेपण घालवून, समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे काम करत असतात, यादृष्टीने कर्तृत्ववान व्यक्तिचा समग्र वा ऐतिहासिक अभ्यास, समाजाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने उपयुक्त व मार्गदर्शक असतो.

विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक वारस्याचा विचार करता, त्यांच्या कार्याला सामाजिक व ऐतिहासिक संदर्भ प्राप्त झालेले आहेत. स्वत:च्या कर्तृत्वाने त्यांनी काळावर व्यापक असा, आपला प्रभाव निर्मान केला आहे. यादृष्टीने महाराष्ट्राच्या राजकारणावर व समाजकारणावर त्यांचा एकूणच प्रभाव जाणवतो. या दृष्टीने संशोधन होणे गरजेचे असल्यामुळे, संशोधनासाठी ' महाराष्ट्राच्या विकासातील विजयसिंह मोहिते-पाटील यांचे योगदान - एक ऐतिहासिक अभ्यास' या विषयाची निवड केली आहे. असा अभ्यास संशोधनाच्या क्षेत्रामध्ये, जगभर केला जात आहे, याचा अनुकूल परिणाम, वैचारिक व सामाजिक क्षेत्रावर होताना दिसतो आहे ही आशादायक बाब संशोधनाच्या दृष्टीने स्वागतार्ह आहे, असे अभ्यासकाला वाटते.

महाराष्ट्राच्या राजकारणात असलेल्या व्यक्तिंचा स्वतंत्रपणे संशोधनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न, आजपर्यंत फारच थोडया संशोधकांनी इतिहास विद्याशाखेतून केलेला आहे. अपवादात्मक अभ्यासकांनी असे संशोधन केलेले असले, तरी ते अनुशंगिक स्वरूपाचे भाष्य आहे, मात्र ते ऐतिहासिकदृष्टया परिपूर्ण आहे, असे म्हणता येणार नाही. पूर्व अभ्यासाचा आधार घेऊन इतिहास विद्याशाखेतील राजकीय व्यक्तिमत्वातील उणीवा दूर करून, या क्षेत्रात नाविण्यपुर्ण संशोधन मांडण्याच्या भूमिकेतून, प्रस्तूत विषयाची निवड संशोधनासाठी केलेली आहे.

- **संशोधन विषयाच्या कालखंडाची व्याप्ती आणि मर्यादा**

प्रस्तूत संशोधन अधिक वस्तूनिष्ठ व परिणामकारक होण्याच्या दृष्टीने, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा निश्चित करणे महत्वाचे असल्यामुळे, प्रस्तूत विषय पुढीलप्रमाणे कालखंडात निश्चित केला आहे, हा कालखंड विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या जन्मापासून म्हणजेच सन १९४४ ते सन २०१९ पर्यंत निश्चित केलेला आहे. या अभ्यासामध्ये विजयसिंह मोहिते-पाटील याच्या व्यक्तिमत्वाला केंद्रस्थानी ठेवून, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा अभ्यास केला जाणार आहे, हा एकूण कालखंड पंच्याहत्तर वर्षांचा असून याच कालखंडावरती अभ्यासाच्या दृष्टीने, लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. एकूणचं आपल्या संशोधन अभ्यासाची ही व्याप्ती आणि मर्यादा आहे.

- **संशोधनाचे महत्व**

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये महाराष्ट्रातील महत्वाची घराणी नेहमीच केंद्रस्थानी राहिली, त्यांच्या समाजकार्याचा प्रभाव जनमाणसाच्या मनावर कायम राहीला व त्यातूनच जनमनाने त्यांना नेतृत्वस्थानी स्विकारले, त्यामध्ये प्रामुख्याने विखे-पाटील, नाईक-निंबाळकर, पवार, चव्हाण, मंडलीक, थोरात, भोसले इत्यादी घराण्याप्रमाणेच सोलापूर जिल्हयाच्या राजकारणावर, सात दशके अकलुजच्या मोहिते-पाटील घराण्याचा प्रभाव राहिलेला दिसून येतो.

विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या लोकनेतृत्वाचे राजकीय कार्याचे रहस्य, सूत्र आणि कार्यप्रणाली इत्यादी बाबींचा सखोल शोध प्रस्तूत संशोधनाद्वारे घेतला जाणार आहे. या संशोधनाचा पुढील पिढींच्या मार्गदर्शनासाठी उपयोग होण्याच्या दृष्टीने हे ऐतिहासिक संशोधन, विश्लेषण, निरीक्षण, उपयुक्ततावादी दृष्टीकोणातून नोंदविले जाणार आहे.

विजयसिंह मोहिते-पाटील या व्यक्तिमत्वाच्या अंगी असणारे समाजशील राजकीय नेतृत्वगुण तटस्थपने, शोधून नव्या पिढीकडे संक्रमित करण्याच्या दृष्टीने प्रस्तूत सेशोधनाचे महत्व ओळखून, या विषयाची मांडणी केली जाणार आहे. विजयसिंह मोहिते-पाटील व्यक्ती नसून महाराष्ट्राच्या समाजपरिवर्तनातील, एक राजकीय विचारप्रणाली आहे, या भूमिकेतून त्यांच्या विचारमूल्यांचा व कार्यप्रणालीचा

तटस्थपणे शोध घेतला जाणार आहे. यामुळे या संशोधनाला सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, वैचारिक व सांस्कृतिक संदर्भ प्राप्त होणार आहेत.

महाराष्ट्राच्या विकासाकरीता विजयसिंह मोहिते-पाटील यांनी केलेले कार्य व त्यांची भूमिका समजण्यास, प्रस्तूत संशोधनातून मदत होईल, महाराष्ट्रातील राजकारण, समाजकारण, अर्थकारण व पक्षसंघटना समजून घेण्यासाठी प्रस्तूत संशोधन महत्वपूर्ण आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टये**

१) विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या राजकीय कारकीर्दीचा अभ्यास करणे.

२) विविध खात्याचे मंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कार्याच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे.

३) विजयसिंह मोहिते-पाटील यांनी केलेल्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा अभ्यास करणे.

४) विजयसिंह मोहिते-पाटील यांनी केलेल्या कृषीविषयक कार्याचा व आर्थिक सुधारणेतील योगदानाचा शोध घेणे.

५) विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या शैक्षणिक कार्याची प्रेरणा व प्रसाराचे मुल्यमापन करणे.

६) विजयसिंह मोहिते-पाटील यांचा सहकारविषयक दृष्टीकोण व त्यांच्या सहकारी संस्थाच्या कार्याचा आढावा घेणे.

७) नैसर्गिक आपत्ती प्रसंगी विजयसिंह मोहिते-पाटील यांनी केलेल्या कार्याचे मुल्यमापन करणे.

८) सोलापूर जिल्हयाच्या इतिहासात विजयसिंह मोहिते-पाटील यांचे राजकीय स्थान निश्चित करणे.

- **गृहितके**

संशोधन समस्येबाबत प्राथमिक समस्येचे ज्ञान व अनुभव संशोधकाला असते. या ज्ञानाच्या आधारावर काही अनुमान किंवा संभाव्य उत्तरे मांडली जातात. त्यामुळे संशोधकाला एक निश्चित दिशा प्राप्त होत असते. या संभाव्य उत्तरांना किंवा अनुमानास 'गृहीतकृत्य' असे सबोधतात.

प्रस्तूत संशोधनाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे काही गृहीतकृत्य नोंदविलेली आहेत ती अशी

१) विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या कार्यकर्तृत्वाचा प्रभाव परिसरातील लोकजीवनावर पडलेला आहे.

२) विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या शैक्षणिक व सहकारविषयक कार्यामुळे परिसरामध्ये अमुलाग्र परिवर्तन झाले आहे.

३) ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कामगार इत्यादी वर्गाला केंद्रस्थानी माणून विजयसिंह मोहिते-पाटील यांनी रचनात्मक कार्य केल्याचे दिसते.

४) विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या कार्यामुळे माळशिरस तालुक्यासह अन्य भागाचा विकास झालेला दिसून येतो.

५) नेतृत्वाच्या अंगी संघटन कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, दूरदृष्टी, समाजहिताची तळमळ इत्यादी गुण असतात याचा प्रत्यय विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या व्यक्तिमत्वामध्ये दिसून येतो.

६) विजयसिंह मोहिते-पाटील यांचे साखर उद्योगातील कार्य शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती उन्नत करणारे आहे.

७) महाराष्ट्र शासनाचे मंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून कार्य करताना, धोरणात्मक विकासयोजना त्यांनी आखल्या, त्याचा परिणाम महाराष्ट्राच्या समाजजीवनावर सकारात्मक झालेला आहे.

८) राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, सहकार आणि शैक्षणिक वारसा विजयसिंह मोहिते-पाटील यांना, त्यांचे वडील शंकरराव मोहिते-पाटील यांच्याकडून मिळालेला आहे.

९) यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, शरद पवार इत्यादीच्या राजकीय विचारांचा प्रभाव विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या, एकूण कार्यावर आहे.

१०) समाजवादी विचाराचा प्रभाव त्यांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक विचारांवर आहे.

- **संशोधन पध्दती**

'इतिहास' हे एक सामाजिक घडामोडींच्या विश्लेषणाचे शास्त्र आहे. या शास्त्राच्या संशोधनासाठी विविध संशोधन पध्दतींचा उपयोग केला जातो. प्रस्तूत संशोधनासाठी व्यष्टी अध्ययन पध्दती, ऐतिहासिक संशोधन पध्दती, मुलाखत संशोधन पध्दती व विश्लेषण संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे.

विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कालखंडाचा वैचारिक प्रभाव, राजकीय प्रभाव यातून आकार पावत गेलेले, त्याचे व्यक्तिमत्व त्यांच्या सामाजिक जाणीवा व त्यांनी केलेले कार्य इत्यादी घटकांचा ऐतिहासिक दृष्टीकोणातून प्रस्तूत संशोधनामध्ये शोध घेतला जाणार आहे.

- **संशोधन साधने**

' महाराष्ट्राच्या विकासातील विजयसिंह मोहिते-पाटील यांचे योगदान - एक ऐतिहासिक अभ्यास' या संशोधनासाठी प्राथमिक साधने, दुय्यम साधने, मुलाखती आणि त्यांच्या भाषणांचा विचार, संशोधनासाठी संदर्भसाधने म्हणून केला जाणार आहे.

ग्रंथालय, वर्तमानपत्रातील कात्रणे, समकालीन लोकांच्या मुलाखती, विजयसिंह मोहिते-पाटील यांची मुलाखत, त्यांची विधीमंडळातील भाषणे व कागदपत्रे इत्यादी साधनांचा प्राथमिक साधन म्हणून विचार केला जाणार आहे. दुय्यम साधनांमध्ये

चरित्रग्रंथ, संशोधन पत्रिका, नियतकालीके, विविध सहकारी संस्था व शैक्षणिक संस्थांचे अहवाल इत्यादी साधनांचा विचार केला जाईल. या बरोबरच तत्कालीन काळातील विविध पक्षातील नेत्यांच्या ग्रंथांचा संदर्भ साहित्यामध्ये विचार केला जाणार आहे, ती अशी :

- **प्रकरण योजना**

'महाराष्ट्राच्या विकासातील विजयसिंह मोहिते-पाटील यांचे योगदान - एक ऐतिहासिक अभ्यास ' या संशोधन अभ्यासाची विभागणी पुढीलप्रमाणे एकूण सात प्रकरणातून केली जाणार आहे.

- **प्रकरण पहिले : प्रास्ताविक**

प्रस्तूत प्रकरणामध्ये संशोधनाविषयी सैध्दांतीक माहिती संशोधन विषयाची निवड, संशोधनाचे महत्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची उद्‌दिष्टये, गृहितके, संशोधन पध्दती, संशोधनाची साधने इत्यादी गोष्टींचा विचार केला जाणार आहे.

- **प्रकरण दुसरे : विजयसिंह मोहिते-पाटील यांचे जीवनचरित्र**

प्रस्तूत प्रकरणामध्ये शंकरराव मोहिते-पाटील यांच्या राजकारणाचा व समाजकारणाचा स्थूल आढावा, विजयसिंह मोहिते-पाटील यांचा जन्म, बालपण, शिक्षण, संस्कार, जडणघडण, कौटुंबिक जीवन, आवडी-निवडी, छंद इत्यादी गोष्टींचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

- **प्रकरण तिसरे : विजयसिंह मोहिते-पाटील यांची राजकीय कारकीर्द**

विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या राजकीय कारकीर्दीचा प्रारंभ, तत्कालीन मतदार संघातील प्रश्न निवडणूकीचा जाहिरनामा, राजकीय प्रवास-, सरपंच, जिल्हा परिषद सदस्य (सोलापूर) व अध्यक्ष, आमदार, खासदार म्हणून कार्य इत्यादी गोष्टींचा संशोधनात्मक अभ्यास केला जाणार आहे.

- **प्रकरण चौथे : विजयसिंह मोहिते–पाटील यांचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य**

विजयसिंह मोहिते–पाटील यांनी राजकीय कार्याबरोबरच बहुजन समाजासाठी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालयीन, व्यावसायीक शिक्षण वस्तीगृहे, स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन, माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण, कृषी शिक्षण इत्यादी शिक्षणविषयक गोष्टींचा विचार केला जाणार आहे.

याबरोबरच समाज विविध स्तरामध्ये, समस्येमध्ये विभागलेला होता. अशा समाजाला समतेच्या तत्वावर एकत्र आणून बंधुत्वाच्या भावनेने माणूसकीची मूल्ये रूजविण्याचे कार्य, आपल्या विचारातून व कार्यातून केलेले आहे. तसेच विजयसिंह मोहिते–पाटील यांनी महाराष्ट्रातील, आपत्ती प्रसंगी सामाजिक बांधिलकी पत्करून आपत्तीग्रस्थ लोकांना मदतीचा हात दिला. प्रामुख्याने १९७२ च्या दुष्काळातील व १९९३ च्या भुकंपातील त्यांनी केलेले, मदतीचे कार्य उल्लेखणीय व अभ्यासणीय आहे, याचा अभ्यास प्रस्तूत प्रकरणामध्ये केला जाणार आहे.

महाराष्ट्रातील लोककलेचे संवर्धन व कलेला प्रोत्साहन देण्याचे कार्य विविध महोत्सवांच्या माध्यमातून, विजयसिंह मोहिते–पाटील यांनी केले, 'शिव–पार्वती' विकास मंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक व सांस्कृतीक उपक्रम राबविले जातात. प्रस्तूत प्रकरणामध्ये विजयसिंह मोहिते–पाटील यांच्या सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक जाणीवेचा अभ्यास नोदविला जाणार आहे.

- **प्रकरण पाचवे : विजयसिंह मोहिते–पाटील यांचे कृषी व सहकार क्षेत्रातील कार्य**

माळशिरस तालुका हा आवर्तनग्रस्थ तालुका असून, या तालुक्याला कृषीक्षेत्रामध्ये स्वावलंबी करण्याचे कार्य विजयसिंह मोहिते–पाटील यांनी केले. शेती उद्योगाला औद्योगीकरणाची जोड देऊन हा व्यवसाय नफ्याचा बनविला यासाठी त्यानी साखर कारखाने, बॅका, सहकारी संस्था, संकरीत गायींचे वाटप, कुक्कूटपालन, जलसिंचनाच्या योजना इत्यादी कृषीपुरक योजना राबविल्या. याबरोबरच

कृषीक्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच शेतकऱ्यांच्या प्रबोधन वर्गाचे आयोजन, औद्योगीक व कृषी प्रदर्शने आयोजित केली, त्यामुळे कृषी व औद्योगीकरणाला चालना मिळाली, याचा विस्तृत शोध प्रस्तूत प्रकरणामध्ये घेतला जाणार आहे.

सहकाराच्या माध्यमातून लोकांच्या आर्थिक उन्नतीचा विचार, विजयसिंह मोहिते-पाटील यांनी केला. सहकारी बॅकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचे कार्य केले. साखर कारखाण्याची स्थापना केली, यामुळे सहकार वाढीस लागला. त्याबरोबरच लोकांची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नती झाली.

- **प्रकरण सहावे : विजयसिंह मोहिते-पाटील यांचे मंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून कार्य**

विजयसिंह मोहिते-पाटील यांचे व्यक्तिमत्व विविध घटकांनी संपन्न आहे. आई-वडीलांच्या संस्कारावर पोसलेले व समाजाच्या प्रश्नांची उत्तम जाण असलेले, एक दृष्टे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते, त्यांचा राजकीय प्रवास तत्कालीन राजकारणाचा विचार करता संघर्षमय आहे, त्याबरोबरच प्रेरणादायीही आहे. आपल्या राजकीय जीवनाची सुरूवात गावपातळीवरून करून उपमुख्यमंत्रीपदा पर्यंत हा प्रवास चढउताराने झालेला आहे, या प्रवासामागे त्यांचे विचार, राजकीय जाणीव व सर्वसामान्यांशी व महाराष्ट्रातील लोकांशी असणारे त्यांचे नातेसंबंध यामुळेच यशस्वी झालेला आहे.

विजयसिंह मोहिते-पाटील यांचा राजकीय प्रवास, राज्य पातळीवर पुढील जबाबदारीच्या अनुषंगाने घडला आहे. तो असा : सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रीडा व युवक कल्याण, कृषी, पर्यटन, जलसंधारण, लाभक्षेत्र विकास, सांस्कृतिक, सहकार, उर्जा, राजशिष्टाचार इत्यादी विविध खात्यांची मंत्रीपदे त्यांनी भूषविली, राजकीय क्षेत्रामध्ये त्यांनी भूषवलेली पदे या अनुषंगाने त्यांच्या जबाबदाऱ्या, निर्णय, विचार याचा राजकारणावर व महाराष्ट्राच्या जीवनावर झालेला परिणाम अभ्यासने महत्वपूर्ण असल्यामुळे मंत्री काळातील त्यांनी घेतलेले निर्णय, राजकीय ध्येयधोरणे, राजकीय योजना, संघटन कौशल्य, दूरदृष्टी, मुत्सद्दीपणा इत्यादी घटकांचा, प्रस्तूत प्रकरणात शोध घेतला जाणार आहे.

- **प्रकरण सातवे :   उपसंहार**

प्रस्तूत प्रकरणामध्ये अभ्यासांती हाती येणाऱ्या निष्कर्षाची मांडणी, उपसंहारामध्ये केली जाणार आहे.

प्रस्तुत संशोधन आराखडयात अभ्यासांती बदल होण्याची शक्यता आहे.